## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये झालेले व्दितीय अपिल

### अपिल क्रमांक : के.आर- ३७६/२०२४

**अपिलार्थी, श्री.विनीत शाह**
५०३, वंदना गॅलक्सी, नारायण शाळेजवळ
भाईंदर (प) ४०१ १०१

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी
शिक्षण विभाग, मिरा भाईंदर महानगरपालिका,
डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन (नगर भवन), मांडली तलाव, दुसरा मजला, भाईंदर (प), ता.जि.ठाणे ४०१ १०१

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी
शिक्षण विभाग, मिरा भाईंदर महानगरपालिका,
डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन (नगर भवन), मांडली तलाव, दुसरा मजला, भाईंदर (प), ता.जि.ठाणे ४०१ १०१

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : १७.०२.२०२५**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| २८.०८.२०२३ | --- | ०३.१०.२०२३ | २६.१२.२०२३ |

अपिलार्थी यांनी दि. ३०.०१.२०२४ रोजीच्या अर्जान्वये *"मुद्येनिहाय माहिती मिळाली नाही."* असे कारण नमूद करुन कलम १९(३) अन्वये व्दितीय अपिल अर्ज दाखल केला आहे. सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक १७.०२.२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय प्राधिकारी अनुपस्थित आहेत (कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत). तसेच तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.विजय रा.वाकडे, प्रभारी प्रशासन अधिकारी, शिक्षण विभाग, मिरा भाईदर महानगरपालिका उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्राणे माहिती मागितली आहे.

*"All documents of schools fulfing RTE norms along with form I, II, III Rule ११ under RTE act २००९ & Rules made in the year २०११.*

१) *Copy of Form. I (Self declaration cum application for grant of recognition of school) form submitted by all schools & same published in public domain under rule ११ of २०११. (see rule ११ (२०)).*
२) *Copy of Certified Audit Statement of all schools, as per rule of २०१२, Form Ii norm १५.*
३) *Copy of all schools certificate of recognition issued as per rule १८ (२) of RTE act.*
४) *Documents of all schools recognized as per rule १९ (१) of RTE act २००९, else action taken against them.*
५) *Complete documents of all schools fullfiling RTE act २००९, २०११ norms & schedule mentioned else action taken against them.*
६) *Any Criminal prosecution initiated against concerned schools & also u/s १८ (५) of the Act, fine of Rs.१,०००००/- imposed against any school."*

सदर प्रकरणी आजच्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असे नमूद केले की, त्यांना अद्यापपर्यंत माहिती प्राप्त झालेली नाही.

जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि.०२.०१.२०२५ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थी यांना असे कळविले आहे की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती ही मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील एकूण ३६६ शाळांची असून, यामध्ये RTE कायद्यानुसार सर्व शाळांशी संबंधित अनेक कागदपत्रांबाबत असून काही शाळांकडून प्राप्त स्कॅन केलेले दस्तावेज (एकूण पाने १९५७), व शाळांची यादी ही माहिती ई-मेलद्वारे पाठविलेली आहे. त्यापत्रामध्ये पुढे असेही नमूद केले आहे की, अपिलार्थी यांच्या अर्जात नमूद व त्यांना अपेक्षित असलेली संबंधित मनपा क्षेत्रातील खाजगी शाळांच्या ज्या नस्ती/माहिती कार्यालयात उपलब्ध आहे व त्यात जी माहिती उपलब्ध आहे या अनुषंगाने कृपया आपण कार्यालयीन वेळेत या कार्यालयात स्वत: उपस्थित राहून उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन करावे जेणेकरुन आपणांस योग्य ते सहकार्य करणे सोईस्कर होईल.

यासंदर्भात अपिलार्थी यांनी असे निवेदन केले की, त्यांना ही माहिती ऑनलाईन प्राप्त झालेली होती. तथापि सदरची फाईल करप्ट असल्याने, ती उघडता आली नाही. त्यामुळे कोणती माहिती पुरविण्यात आलेली आहे, त्याची कल्पना नाही. यासंदर्भात अपिलार्थी यांनी पुढे असाही युक्तीवाद केला की, खाजगी शाळांकडून अर्ज महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाकडे प्राप्त होतात. सदर अर्ज मंजूरीसाठी जिल्हा परिषदेकडे पाठविण्यात येतात. जिल्हा परिषदेकडून त्यास मंजूरी देऊन ते प्रस्ताव महानगरपालिकेकडे परत प्राप्त होतात वत्यानंतर अशा मंजूरीबाबत शाळांना कळविण्यात येते. अशा बऱ्याच खाजगी शाळांनी मागील काही कालावधीपासून पुनर्मान्यता घेतलेली नाही आणि ही बाब

अतिशय गंभीर आहे. त्यामुळे कोणती शाळा मान्यताप्राप्त आहे व कोणती शाळा नाही, याची नागरिकांना माहिती नाही. अशा परिस्थितीत मान्यता प्राप्त नसलेल्या शाळेमध्ये ॲडमिशन घेलेल्या मुलांचे शैक्षणिक नुकसान होण्याचे नाकारता येत नाही. त्यामुळे ही माहिती महत्वाची आहे व ती आपणास मिळणे आवश्यक आहे.

त्यावर जन माहिती अधिकारी यांचे असे म्हणणे आहे की, त्यांचे कार्यालयात ही माहिती आढळून येत नाही. तत्कालीन अधिकारी यांनी त्या नस्ती ठेवल्या किंवा कसे? हे त्यांना सांगता येत नाही. मिरा भाईंदर महानगरपालिकेतील एकूण ३६६ शाळांपैकी अंदाजे ५० शाळांची माहिती उपलब्ध असेल, असे निवेदन त्यांनी केले.

जन माहिती अधिकारी यांचे हे निवेदन लक्षात घेता, मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या शिक्षण विभागात यासंदर्भात व्यवस्थितपणे माहिती ठेवण्यात आली नाही, असे स्पष्ट होत आहे. शाळांना द्यावयाच्या मान्यता संबंधाने माहिती उपलब्ध नसणे व ती का उपलब्ध नाही, याची देखिल माहिती जन माहिती अधिकारी यांचेकडे नसणे हे जितके गंभीर आहे, तितकेच आश्चर्यकारक सुध्दा आहे. माहिती उपलब्ध असण्याबाबत जन माहिती अधिकारी हे कोणतेही ठोस निवेदन आजच्या सुनावणी दरम्यान करु शकले नाहीत. त्यामुळे विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांनी मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना विनामुल्य पुरविणे योग्य होईल. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल. या प्रकरणाच्या पुढील सुनावणीसाठी शिक्षणाधिकारी, शिक्षण विभाग, मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी अपिलार्थी यांना पुरविलेल्या माहितीबाबतचा अहवाल घेऊन, स्वत: उपस्थित रहाणे योग्य होईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

<u>आदेश</u>

१. विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी **अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने मागीतलेली संपूर्ण माहिती १५ दिवसात समक्ष/ नोंदणीकृत टपालाने नि:शुल्क पुरवावी.** जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विविक्षित उत्तर अपिलकर्ता यांना १५ दिवसांत पाठवावे.
२. शिक्षणाधिकारी, शिक्षण विभाग, मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी सदर माहिती अपिलार्थी यांना पुरविलेल्याबाबतचा अहवाल घेऊन, पुढील सुनावणीसाठी स्वत: उपस्थित रहावे.
३. प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.०५.०५.२०२५ रोजी दुपारी १२.३० वाजता घेण्यात येईल.

सही/-
(शेखर चन्ने)
राज्य माहिती आयुक्त,
कोंकण खंडपीठ

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १७ फेब्रुवारी, २०२५.

राज्य माहिती आयोग,

**सुनावणी दिनांक ०५.०५.२०२५ ( In Continuation of order dt. १७.०२.२०२५)**

**विवेचन**

उपरोक्त दि.१७.०२.२०२५ रोजीच्या आदेशान्वये विद्यमान जन माहिती अधिकारी यांना माहिती पुरविणेबाबत व शिक्षणाधिकारी, शिक्षण विभाग, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना अहवाल सादर करणेबाबत आदेशीत केले होते. त्याअनुषंगाने सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक ०५.०५.२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय प्राधिकारी श्री.प्रसाद शिंगटे, उपायुक्त (शिक्षण ) व शिक्षणाधिकारी, शिक्षण विभाग (माध्य.), मिरा भाईंदर महानगरपालिका अनुपस्थित आहेत (कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत). तसेच तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.विजय वाकडे, प्रभारी प्रशासकिय अधिकारी, शिक्षण विभाग (माध्य.), मिरा भाईंदर महानगरपालिका उपस्थित आहेत.

सदर प्रकरणी आजच्या सुनावणीच्या वेळी उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी असे निवेदन केले की, अद्यापही संपूर्ण माहिती अपिलार्थी यांना देण्यात आलेली नाही. जी माहिती उपलब्ध आहे ती देण्यात आली आहे. माहिती शिक्षणाधिकारी यांचेकडे उपलब्ध असून, ती आपल्याकडे उपलब्ध नाही. यावरुन आयोगाच्या दि.१७.०२.२०२५ रोजीच्या आदेशात नमूद केलेल्या मुदतीमध्ये अपिलार्थी यांना माहिती प्राप्त झालेली नाही असे स्पष्ट होते. सबब विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या आदेशानंतरही अपिलार्थी यांना माहिती दिलेली नाही. त्यामुळे विद्यमान जन माहिती अधिकारी यांचेविरुध्द माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २०(१) अन्वये माहिती पुरविण्यासाठी झालेल्या विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा मागविणे आवश्यक आहे.

आयोगाच्या आदेशानंतर देखील अद्यापपर्यंत अपिलार्थी यांना माहिती देण्यात आलेली नसल्याने, याप्रकरणी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ (३) अंतर्गत चौकशी करणे योग्य होईल, असे आयोगाचे मत आहे. विशेषत: सदरची माहिती शिक्षणाधिकारी यांचेकडे उपलब्ध आहे. जन माहिती अधिकारी यांचे विधान लक्षात घेता याप्रकरणात पुढीलप्रमाणे चौकशीची आवश्यकता आहे हे प्रकर्षाने जाणवते. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

<u>आदेश</u>

१. विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.विजय वाकडे, प्रभारी प्रशासकीय अधिकारी, शिक्षण विभाग, मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी अपिलार्थी यांच्या दिनांक २८.०८.२०२३ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन आयोगाच्या दि.१७.०२.२०२५ रोजीच्या आदेशानंतर देखील माहिती पुरविली नाही. म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये माहिती पुरविण्यास झालेल्या विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये,

याचा लेखी खुलासा त्यांनी आयोगाकडे पुढील सुनावणीच्या वेळी स्वत: उपस्थित राहून सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.

२. जन माहिती अधिकारी यांचे विधान लक्षात घेता, सदरची माहिती शिक्षणाधिकारी, शिक्षण विभाग यांचेकडे उपलब्ध आहे. शिक्षणाधिकारी यांनी आयोगाच्या आदेशानंतर देखील अद्यापपर्यंत अपिलार्थी यांना माहिती दिलेली नसल्याने, याप्रकरणी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ (३) अंतर्गत चौकशी करणे आवश्यक आहे हे प्रकर्षाने जाणवते. सबब या चौकशी करिता उपस्थित राहणेस्तव उप सचिव, महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, कोकण खंडपीठ यांनी श्रीम.दिपाली जोशी, सहा.आयुक्त (अति.कार्यभार शिक्षणाधिकारी), शिक्षण विभाग, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना पुढील सुनावणीस उपस्थित राहण्यासाठी माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ (३) (क) अन्वये समन्स बजावण्यात यावे. सदर समन्स ची बजावणी भाईंदर पोलीस स्टेशन, भाईंदर (प.) तसेच पोलीस आयुक्त, मिरा भाईंदर पोलीस आयुक्तालय यांचे मार्फत करण्यात यावी.

३. प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.२३.०७.२०२५ रोजी दुपारी १२.३० वाजता घेण्यात येईल.

सही/-
**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ०५ मे, २०२५ .

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना,**
उप सचिव,
महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ,
कोकण भवन, ५ वा मजला, रुम नं.५२७/५२८,
सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.

तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.विजय वाकडे,
प्रशासकीय अधिकारी,शिक्षण विभाग, मिरा भाईंदर महानगरपालिका,
डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन (नगर भवन), मांडली तलाव, दुसरा मजला,
भाईंदर (प), ता.जि.ठाणे ४०११०१.

राज्य माहिती आयोग,

**सुनावणी दिनांक २३.०७.२०२५ ( In Continuation of order dt. ०५.०५.२०२५)**

## विवेचन

उपरोक्त दि.०५.०५.२०२५ रोजीच्या आदेशान्वये विद्यमान जन माहिती अधिकारी यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २० (१) अन्वये खुलासा सादर करणेबाबत व श्रीम.दिपाली जोशी, सहा.आयुक्त (अति.कार्यभार शिक्षणाधिकारी), शिक्षण विभाग, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना समन्स बजावणेबाबत आदेशित केले होते. त्याअनुषंगाने सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक २३.०७.२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी उपस्थित आहेत. तसेच तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.विजय वाकडे, प्रशासकीय अधिकारी,शिक्षण विभाग, मिरा भाईंदर महानगरपालिका उपस्थित आहेत.

सदर प्रकरणी अपिलार्थी यांनी असे निवेदन केले की, आयोगाच्या दि.१७.०२.२०२५ रोजीच्या आदेशानंतर देखील त्यांना अद्यापपर्यंत संपूर्ण माहिती प्राप्त झालेली नाही.

श्रीम.दिपाली जोशी, सहा.आयुक्त (अति.कार्यभार शिक्षणाधिकारी), शिक्षण विभाग, मिरा भाईंदर महानगरपालिका या आजच्या सुनावणीस उपस्थित आहेत. त्यांनी असे निवेदन केले की, हा कार्यभार त्यांनी ऑगस्ट २०२४ पासून स्विकारलेला आहे. खाजगी शाळांबाबत त्यांना कोणतीही माहिती नव्हती. ही सर्व प्रकरणे शासनाकडून प्रतिनियुक्तीवर आलेल्या शिक्षणाधिकारी यांनी हाताळलेली आहे. त्यामुळे हा अभिलेख कार्यालयात आढळून येत नाही. तथापि आम्ही ही माहिती शोधून दीड ते दोन महिन्यात अपिलार्थी यांना उपलब्ध करुन देऊ.

तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.विजय वाकडे,प्रशासकीय अधिकारी,शिक्षण विभाग, मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी दि.२२.०७.२०२५ रोजीच्या पत्रान्वये त्यांचा खुलासा सादर केला आहे. त्यामध्ये त्यांनी असे नमूद केले आहे की, मिरा भाईंदर कार्यक्षेत्रातील सर्व शाळांची यादी अपिलार्थी यांना ई-मेलद्वारे पाठविलेली आहे. खाजगी शाळांच्या प्रथम मान्यता, वर्ग मान्यता, तुकडी मान्यता, नाहरकत प्रमाणपत्र, पत्ता, संख्या माहिती, नमुना १ व २, तपासणी अहवाल, ऑडीट रिपोर्ट, पुनर्मान्यता इत्यादी बाबत कार्यालयात उपलब्ध असलेल्या शाळांच्या प्राप्त दस्तावेजांचे अवलोकन करण्यास अर्जदार यांना यापूर्वी देखील कळविले आहे. त्यानुसार त्यांनी काही उपलबध नस्तीचे अवलोकन केले आहे. खाजगी शाळांशी संबंधित ३५ मुद्यांची माहिती ही संबंधित खाजगी शाळांकडून मागील ०३ वर्षात वेळोवेळी पत्रान्वये व मिटींग दरम्यान मौखिक आदेशान्वये कार्यालयात सादर करण्यासाठी कळविले आहे. त्यानुसार कार्यालयात ६२ खाजगी शाळांची माहिती नव्याने प्राप्त झाली आहे.

इतर शाळांबाबत माहितीसाठी कार्यवाही सुरु आहे. यासंबंधीत श्री.विजय वाकडे यांनी अशी विनंती केली आहे की, उर्वरीत शाळांकडून सदर माहिती घेण्यासाठी किमान ९० दिवसांचा अवधी मिळाल्यास संबंधित अर्जदार यांना याबाबतची प्राप्त झालेली व उपलब्ध असलेली माहिती देण्याता येईल.

अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, त्यांनी शिक्षणाधिकारी, मिरा भाईंदर महानगरपालिका यांचे कार्यालयात उपलब्ध असणे अपेक्षित असलेली माहिती मागीतलेली आहे. यामध्ये अशी कोणतीही माहिती नाही जी की शिक्षणाधिकारी यांचे कार्यालयाकडे उपलब्ध नसल्यामुळे ती संबंधित शाळांकडून प्राप्त करुन घ्यावी लागेल. असे असतानाही जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या आदेशानंतरसुध्दा अद्यापपर्यंत अपिलार्थी यांना माहिती दिलेली नाही व ते अजुन ९० दिवसांचा वेळ मागत आहेत.

अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीबाबत निश्चित काय परिस्थिती आहे. याबाबत यासंबंधाने संभ्रम निर्माण होत आहे. मागणी केलेली माहिती कार्यालयात उपलब्ध आहे किंवा नाही, ती उपलब्ध असणे अपेक्षित आहे किंवा नाही, खाजगी शाळांच्या मान्यतेचे/पुनर्मान्यतेचे प्रस्ताव शिक्षणाधिकारी, मिरा भाईंदर महानगरपालिका यांचे कार्यालयामार्फत शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे यांना पाठविण्यात आले किंवा कसे? असे प्रस्ताव पाठविले असल्यास त्यांच्या प्रती मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या शिक्षण विभागात उपलब्ध आहेत किंवा कसे? त्या उपलबध नसल्यास त्याची कारणे काय आहेत? यासंदर्भात सविस्तर शपथपत्र विभाग प्रमुख म्हणून श्रीम.दिपाली जोशी, सहा.आयुक्त (अति.कार्यभार शिक्षणाधिकारी), शिक्षण विभाग, मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी पुढील सुनावणीच्या वेळी सादर करणे योग्य होईल. या शपथपत्रामध्ये त्यांनी वर नमूद मुद्यांसह त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असणे अपेक्षित असलेली माहिती उपलब्ध नसल्यास, त्यासंदर्भात विभाग प्रमुख म्हणून त्या काय कारवाई करणार आहेत. हे सुध्दा नमूद करणे योग्य होईल.

तसेच तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.विजय वाकडे,प्रशासकीय अधिकारी,शिक्षण विभाग, मिरा भाईंदर महानगरपालिका यांच्या खुलाश्याची आयोगाने नोंद घेतलेली आहे. त्यांना आकारावयाच्या शास्तीबाबत ते माहिती पुरविण्याबाबत कशी भूमिका बजावतात ते लक्षात घेऊन, निर्णय घेण्यात येईल. प्रकरण पुढील तारखेवर श्रीम.दिपाली जोशी, सहा.आयुक्त (अति.कार्यभार शिक्षणाधिकारी), शिक्षण विभाग, मिरा भाईंदर महानगरपालिका यांच्या शपथपत्रासाठी ठेवण्यात येत आहे. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. श्रीम.दिपाली जोशी, सहा.आयुक्त (अति.कार्यभार शिक्षणाधिकारी), शिक्षण विभाग, मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी पुढील सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती कार्यालयात उपलब्ध आहे किंवा नाही, ती उपलब्ध असणे अपेक्षित आहे किंवा नाही, खाजगी शाळांच्या मान्यतेचे/पुर्नमान्यतेचे प्रस्ताव शिक्षणाधिकारी, मिरा भाईंदर महानगरपालिका यांचे कार्यालयामार्फत शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे यांना पाठविण्यात आले किंवा कसे? असे प्रस्ताव पाठविले असल्यास त्यांच्या प्रती मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या शिक्षण विभागात उपलब्ध आहेत किंवा कसे? त्या उपलबध नसल्यास त्याची कारणे काय आहेत? यासंदर्भात सविस्तर शपथपत्र सादर करावे. या शपथपत्रामध्ये त्यांनी वर नमूद मुद्यांसह उपलब्ध असणे अपेक्षित असलेली माहिती उपलब्ध नसल्यास, त्यासंदर्भात विभाग प्रमुख म्हणून त्या काय कारवाई करणार आहेत हे सुध्दा नमूद करावे.

२. प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.३०.०७.२०२५ रोजी दुपारी १२.३० वाजता घेण्यात येईल.

(शेखर चन्ने)
राज्य माहिती आयुक्त,
कोंकण खंडपीठ

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : २३ जुलै, २०२५ .

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना,**
श्रीम.दिपाली जोशी, सहा.आयुक्त (अति.कार्यभार शिक्षणाधिकारी),
शिक्षण विभाग, मिरा भाईंदर महानगरपालिका, डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन,
(नगर भवन), मांडली तलाव, दुसरा मजला, भाईंदर (प), ता.जि.ठाणे ४०१ १०१.